वाचा - १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे कडिल आदेश क्र.आरोग्य/आस्था-५/५२३/२०१६ दिनांक २५/०५/२०१६

२) श्रीम.कमल श्रीरंग भगत, आरोग्य सेविका, प्रा.आ.केंद्र.पांगारणे, उपकेद्र.पांगारणे-२ ता.सुरगाणा यांचा दिनांक २२/०६/२०१७ रोजीचा विनंती अर्ज.

३) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-जिपब- ४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ मंत्रालय-४०००३२ मुंबई दि. १५ मे २०१४

४) मा.अधिष्ठता, जे.जे.रुग्णालय, मुंबई यांचे कडिल पत्र जा.क्र.जे.जे.रुग्णा/वैद्यकीय मंडळ प्रमाणपत्र/११८३/१७ अधिनिष्ठता यांचे कार्यालय सर जे.जे.समुह रुग्णालये, भायखळा, मुंबई-४००००८ दि.०३/०५/२०१७

५) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक -39 /०८/२०१७.

---

**आदेश**

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक,**
**आरोग्य विभाग,**
**जा.क्र. आरोग्य/आस्था-५/ 9900/२०१७.**
**नाशिक, दिनांकः- 39/ 8 /२०१७.**

श्रीम.कमल श्रीरंग भगत,आरोग्य सेविका (महिला), प्राथमिक आरोग्य केंद्र वाडीवऱ्हे, उपकेंद्र. मोडाळे, ता. इगतपूरी यांची दिनांक २५/०५/२०१६ चे आदेशान्वये प्रशासकीय कारणास्तव पेसा क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र. पांगारणे, अंतर्गत पांगारणे-२ ता. सुरगाणा येथे बदली करण्यात आलेली होती. मात्र प्रशासकीय बदली ही अत्यंत दुर्गम भागात व गैरसोईची झाल्याने तसेच त्यांचे पती हे अपंग असुन कौंटुबिंक कारणास्तव त्यांनी विनंती अर्ज देऊन बदली मध्ये अंशतः बदलाची मागणी केली होती. श्रीमती भगत, आरोग्य सेविका यांना प्रा.आ.केंद्र वाडीवऱ्हे, उपकेंद्र. मोडाळे, ता. इगतपूरी येथून दिनांक १६/८/२०१६ रोजी कार्यमुक्त करुनही त्या पेसा क्षेत्रातील प्रा.आ.केंद्र.पांगारणे, उपकेंद्र पांगारणे-२ ता.सुरगाणा येथे हजर झालेल्या नाही. दिनांक २१/६/२०१७ रोजी त्या वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.पांगारणे येथे हजर होण्यांस गेल्या असता उपकेंद्र. पांगारणे-२ हे पद सन-२०१७ च्या सार्वत्रिक बदलीने पद भरण्यात आल्याने श्रीम.भगत यांना सुरगाणा गटात हजर करुन घेण्यात आले नाही. श्रीमती भगत हयांनी दिनांक २२/६/२०१७ रोजी अर्ज देऊन समवेत वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.पांगारणे, ता.सुरगाणा यांचे पत्र देऊन नविन पदस्थापना मिळणेबाबत विनंती अर्ज दिला.

श्रीम.भगत यांना प्रा.आ.केंद्र.वाडीऱ्हे, उपकेंद.मोडाळे येथून बदली ठिकाणी हजर होणेस दि.१६/०८/२०१६ रोजी कार्यमुक्त करुनही त्या अनाधिकृत गैरहजर राहील्या. त्यांचा गैरहजर कालावधी ९० दिवसापेक्षा जास्त असल्याने त्यांना शारिरीक दृष्टया तपासणी कामी जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे पाठविणेत आले.दिनांक. ०३/०८/२०१७ चे मा.अधिष्ठता, जे.जे.रुग्णालय, मुंबई यांचे कडिल अहवालानुसार त्या शारिरीक दृष्टया जिल्हा परिषद सेवेस पात्र असले बाबत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने ***श्रीम. कमल श्रीरंग भगत, आरोग्य सेविका (महिला) यांना प्राथमिक आरोग्य केंद्र.-कोचरगांव अंतर्गत उपकेंद्र.-रवळगांव--, ता.-दिंडोरी- येथे पदस्थापना देण्यात येत आहे.***

श्रीम. भगत, आरोग्य सेविका (महिला) यांनी पदस्थापना दिलेल्या ठिकाणी तात्काळ हजर हजर यावे.

श्रीम. भगत, आरोग्य सेविका (महिला) यांचे वेतन व भत्ते त्याना नव्याने देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांका पासुन काढण्यात यावेत. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

तसेच श्रीमती भगत यांचा दि.१६/०८/२०१६ ते हजर होवेपावेतो पर्यतचा गैरहजर कालावधीबाबतचा निर्णय खाते चौकशी अंती घेण्यात येईल.

सदर आदेशाची नोंद श्रीम.कमल श्रीरंग भगत, आरोग्य सेविका (महिला) यांचे मुळसेवा पुस्तकात घेणेत यावी.

31/08

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रत - योग्य त्या कार्यवाहीस्तव व माहीतीस्तव रवाना . . . . .**

१) श्रीम.कमल श्रीरंग भगत,आरोग्य सेविका (महिला) प्रा.आ.केंद्र.कोचरगांव-- उपकेंद्र.रवळगांव-- ता.दिंडोरी

२) गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती,सुरगाणा / दिंडोरी---

३) तालुका वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती,सुरगाणा / दिंडोरी---

४) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र.कोचरगांव-- ता. दिंडोरी-----

५) ज्ञापन नस्ती.